# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७, फॅक्स :(०२२)२२१५१८६७. ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in

जा. क्र./मरासुम/प्रशासन/२०५३/२०२१. दि. २९/०९/२०२१

**विषय :- मोबाईलवर बल्क SMS सुविधा उपलब्ध होणेकरिता पुरवठादार निवड करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या कार्यालयाद्वारे मोबाईलवर बल्क SMS पाठविण्याची सुविधा उपलब्ध होणे करिता एक वर्षाकरिता, पुरवठादार निवड करावयाचा आहे.

जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या Specifications नुसार दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात कार्यालयाच्या खालील पत्यावर **दि. ०८/१०/२०२१ रोजी १८.००** वाजेपर्यंत सादर करावीत. त्यानंतर येणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

मोबाईलवर बल्क SMS पाठविण्याच्या सुविधेमध्ये जे Specification हेवे आहेत ते तसेच त्याबाबतच्या अधिक माहिती करिता www.mahasecurity.gov.in व www.maharashtra.gov.in वेबसाईटला भेट द्यावी.

या प्रक्रिये संदर्भातील अंतीम निर्णय महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचा राहील.

**Sd/-**

**पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक**

**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.**

Scanned with CamScanner

जा. क्र./मरासुम/प्रशासन/२०५३ /२०२१ दि. २९/०९/२०२१

# जाहिरात

**मोबाईलवर बल्क SMS सुविधा उपलब्ध होणेकरिता पुरवठादार निवड करणेबाबत.**

## महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७, फॅक्स :(०२२)२२१५१८६७.
ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in

Scanned with CamScanner

1) परिचय

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, हे शासनाचे वैधानिक महामंडळ आहे. महामंडळाच्या मुख्यालयाद्वारे भरती वेळी उमेदवारांना द्यावयाच्या सुचना/प्रशिक्षणाकरिता पाठविणेबाबतच्या सुचना तसेच नियुक्ती करिता वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचना; त्यांच्या मोबाईल क्रमांकावर SMS द्वारे पाठविणेकरिता, बल्क SMS सुविधेची आवश्यकता भासत आहे. पुरवठादार निवड करण्याच्या अनुषंगाने, सदर जाहिरातीव्दारे इच्छुक पुरवठादारकांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

2) दरपत्रक पाठविणे करिता व उघडणेकरीता हजर रहावयाचे असल्यास पत्ता व दुरध्वनी क्र. :-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - 1, 32 मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - 400 005.
दूरध्वनी : (022) 2215 1847, फॅक्स :(022) 22151867.

3) महत्तवाच्या दिनांक व वेळ :-

1. दरपत्रके सादर करण्याचा दिनांक :- 29/09/2021 व वेळ :- 9.45 AM ते 18.00 PM पर्यंत.
2. दरपत्रके सादर करण्याची शेवटची दिनांक :- 08/10/2021 वेळ :- 18.00 PM पर्यंत.
3. दरपत्रके उघडणेकरीताची दिनांक :- दि. 12/10/2021 रोजी, वेळ:- 12.30 वाजता.

4) Bulk SMS सुविधेकरिता निर्धारित केलेले Specifications :-

| Sr. No. | Particulars (Per SMS Cost) | Cost of SMS on Submission (Upto 3 lacs/Year) (Prepaid) with (DLT) Charges & GST Charges Rate |
|---|---|---|
| 1 | Domestic Massaging | |

5) पुरवठादारकांनी दरपत्रकासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-

पुरवठादारांनी कंपनीच्या नावे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणे हेतू, कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीचा एक संच सोबत जोडून सादर करणे आवश्यक आहे.

1) कंपनी / फर्म मालकाचे पासपोर्ट आकाराचे दोन फोटो.
2) ओळखीचा पुरावा म्हणून पॅनकार्ड/आधार कार्ड/पासपोर्ट/मतदार व ओळखपत्र इ.
3) मोबाईलवर बल्क SMS सुविधा पुरवित असलेल्या विविध कंपन्यांचे अनुभव प्रमाणपत्र.
4) कंपनी / फर्मच्या नावे GST अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
5) कंपनी / फर्मच्या नावे मागील तीन वर्षाचे (Income Tax Return Acknowledgement.) आयकर विवरणपत्राच्या प्रती जोडाव्या. तसेच कंपनीचे मागील तीन वर्षाचे वार्षिक ताळेबंद (नफा-तोटा पत्रक; बॅलन्सशीट) यांच्या प्रती जोडाव्यात.



Scanned with CamScanner

6) **निवड प्रक्रिया :-**

1. जे पुरवठादार महामंडळास उत्तम सुविधा कमी दरात देण्यास इच्छूक आहेत अशा पुरवठादारकांची निवड यादी तयार करण्यात येईल.
2. निवड केलेल्या पुरवठादारकांस निवड केल्याचे पत्र ई-मेल आय-डीद्वारे तसेच पत्राद्वारे कळविले जाईल.
3. निवडलेल्या पुरवठादारकास आवश्यक सुविधा पुरवठा करावयाच्या अटी व शर्तीसह नियुक्ती पत्र दिले जाईल. प्रथम नियुक्ती ही एक वर्ष कालावधीसाठी राहील व गरजेनुसार पुनर्नियुक्तीचा विचार केला जाईल.
4. दरपत्रके उघडणेस्तव पुरवठादारकांनी जाहिराती मध्ये नमुद दिनांक व वेळेत हजर रहावे.

7) **सूचना :-**

कृपया दरपत्रक सादर करणेपुर्वी खालील सूचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

1. इच्छूक पुरवठादारकांनी एका वेळेस एकच दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे.
2. एका पुरवठादाराची अनेक दरपत्रके प्राप्त झाल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही.
3. अंतीम दिनांकानंतर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
4. पुरवठादाराने दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावीत.
5. मुख्यालयास आवश्यक सुविधेबाबतची माहिती सोबत सादर करण्यात आली आहे.
6. सदर सुविधा सध्यस्थिती लक्षात घेता देण्यात आली आहे. भविष्यामध्ये या Specification व्यतिरीक्त, विविध बाबी जोडण्यात येणाऱ्या पुरवठादाराची आवश्यकता भासणार असून, त्या सादर केलेल्या यादीत नमुद नाहीत; तसेच ऐनवेळेच्या आवश्यक त्या Requirement नुसार वाटाघाटीने किंमत ठरविण्यात येईल.
7. जे पुरवठादार सोबत जोडलेल्या Specification नुसार सुविधा पुरवू शकत असतील त्यांनीच दरपत्रक सादर करावीत.
8. पुरवठादारकांची निवड केल्यानंतर त्यांना महामंडळास आवश्यक सुविधा पुरविणे बंद करावयाचा असल्यास 60 दिवस आधी लेखी सूचना देणे बंधनकारक आहे.

8) **सदर निवड प्रक्रिया कोणत्याही वेळी / कोणत्याही कारणास्तव / कोणत्याही टप्प्यावर / पुर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा / फेरबदल करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.**

Sd/-
पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.



Scanned with CamScanner